**National Health Mission**
**State Health Society Maharashtra (SHS), Mumbai**
**SHS invites applications from eligible candidates for filling up the following posts**
**(On contractual basis in Maharashtra State as indicated below.)**

**Link for the filling online Google form for the Corporation/Council /CB level posts-**

| Sr.No | Name of the Post | Place of Posting (Corporation, Council & CB wise attached Details Annexure) | | Age (Upper Limit) | Total No of Posts | Category | Essential Qualification | Essential Experience | Remuneration (In Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **City Program Manager** | **Municipal Corporations** MCGM-2, Thane-1, Solapur-1, Bhivandi-1, Jalgoan-1, Dhule-1, Panvel-1 | 8 | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | 8 | ST- 2, NT- (B)- 1, NT- (C) - 1 NT (D) - 1 SBC - 1 EWS - 2 | M.B.B.S or B.D.S / B.A.M.S/ B.H.M.S / B.U.M.S + MPH / MHA / MBA in Health care Administration | Minimum 1 year experience of working in public health/ health services. Administrative experience in public health will be preferred. | Rs.35,000/- + Additional Rs. 5000 Only for MBBS Candidates |
| | | **Total (CPM Post)** | **8** | | | **8** | | | |
| 2 | **Public Health Manager (National Urban Health Mission)** | **SHS, Mumbai** | 5 | | 103 | SC - 10, ST- 9, VJ-A-4, NT (B)- 3, NT (C)- 4, NT (D)- 3, OBC -14 SBC-3 , EWS- 12 , OPEN-41 | M.B.B.S or Graduate in Health Sciences (B.D.S / B.A.M.S / B.H.M.S / B.U.M.S / B.P.Th . / Nursing (Basic) / (P.B.Bsc ) / B.Pharm / + MPH / MHA/ MBA in Health care Administration | Minimum 1 year experience of working in public health/ health services. Administrative experience in public health will be preferred. Experince critriea will be relaxed if suitable candidate are not available. | Rs.32,000/- + Additional Rs. 5000 Only for MBBS Candidates |
| | | **Municipal Corporations** Pune -6 , Thane-2, Pimpri Chinchwad-2,Vasai Vira -3, Nashik-2, Kalyan Dombiwali-3, Aurangabad-1, Navi Mumbai-2, Solapur- 4, Mira Bhaindar-1, Bhivandi-2, Amravati-3, Malegoan-1, Kolhapur-2, Ulhasnagar-2, Sangli-2, Jalgoan-2, Akola-1, Latur-1, Dhule-1, Ahmadnagar-1, Chandrapur-1, Parbhani-1 | 46 | | | | | | |
| | | Municipal Councils Ichalkaranji-1, Jalna-1, Ambarnath-1, Beed-1, Bhusawal-1,Badlapur-1,Gondia-1,Kamptee-1,Satara-1,Barshi-1,Yavatmal-1, Hinganghat-1,Achalpur-1,Osmanabad-1, Nandurbar-1, Wardha-1, Pandhrpur-1,Chalisgaon-1,Amlerner-1, Khamgaon-1,Akot-1,Bhandara-1,Parli-1,Shrirampur-1,Baramati-1,Hingoli -1,Manmad-1,Shirpur -Warvade-1,Ratnagiri-1,Ambejogai-1,Pusad -1, Chopda-1,Khopoli-1, Karad-1, Palghar-1,wasmath-1, Malkapur-1, Buldhana-1, Uran Islampur-1, Sangamner-1,Degloor -1, Kopargaon-1, Shegaon-1, Pachora-1, Sillod -1, Chikhli-1, Lonavala-1, Anjangaon-1,Phaltan-1,Chiplun-1, Dahanu-1 | 51 | | | | | | |
| | | Cantonment board (CB) Deolali-1 | 1 | | | | | | |
| | | **Total** | **103** | | | **103** | | | |
| | | **Grand Total** | **111** | | **0** | **111** | | | |

**Commissioner, Health Services & Mission Director, National Health Mission, Mumbai**

## राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत City Program Manager & Public Health Manager रिक्त पदभरतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार मंजुर पदांपैकी रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात www.arogya.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून अर्ज करावयाच्या पध्दतीबाबत सर्वसाधारण सुचना/माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

सर्व सूचनांचे काळजी पूर्वक वाचन करून अर्ज विहित केलेल्या पध्दती नुसारच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या नमुद माहितीच्या आधारे व मुलाखती दरम्यान सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या/कागदपत्रांच्या आधारे उमेदवार पात्र व अपात्र ठरविण्यात येईल. व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

अर्ज स्वीकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवाराची निवड झाली असा होणार नाही. निवड प्रक्रिये दरम्यान कोणत्याही वेळी किंवा उमेदवाराच्या निवडी नंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याने किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी / निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

क) अर्ज करण्याच्या अनुषंगाने सुचना -

१) सर्व उमेदवारांनी जाहिरातीत नमूद **गुगल लिंकवर** ऑनलाईन गुगल फॉर्म मध्येच अर्ज विहित कालावधीत भरणे आवश्यक आहे.

महानगरपालिका स्तरावरील City Program Manager पदाकरीता
https://forms.gle/Yxt75SJXug4uGt6S9

महानगरपालिका/नगरपालिका व कटकमंडळे अंतर्गत Public Health Manager पदाकरीता
https://forms.gle/dF9jH6u6J2psS1mw7

२) अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्याची माहिती अचून भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

३) गुगल फॉर्म परीपुर्ण भरल्यावर त्याची प्रिंट काढावी.

४) पुर्ण भरलेल्या गुगल फॉमची स्वसाक्षांकित प्रत व अर्ज मुद्दा (ट) मधील क्र.१० मध्ये नमूद पत्त्यावर विहित कालमर्यादेत सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर सादर करण्यात येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही. टपालाने/कुरीयरने सादर करण्यात आलेले अर्ज विहीत कालावधीत या कार्यालयात पोहोचतील याची दक्षता घ्यावी. उशीरा प्राप्त अर्जाची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**५) गुगल फॉर्म व धनाकर्ष व्यतिरिक्त इतर कागदपत्र जोडु नयेत.**

६) अर्जदाराने प्रत्यक्ष भरलेल्या गुगल फॉर्मची प्रत या कार्यालयास प्राप्त नसल्यास असा अर्ज अपूर्ण समजण्यात येऊन तो रद्द करण्यात येईल.

७) एका पदाकरीता एकच गुगल फॉर्म भरणे आवश्यक आहे.एका पेक्षा अधिक पदांकरीता उमेदवार अर्ज करत असेल, त्यावेळेस प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र गुगल फॉर्म भरणे आवश्यक आहे तसेच प्रत्येक पदाकरीता अर्ज शुल्काचा स्वतंत्र धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे.

5/7/22

ख) वयोमर्यादा -

१) गुगल अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच दि.२५/०७/२०२२ रोजी उमेदवाराचे वय जाहिरातीत विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.

२) राखीव प्रवर्गातील उमेदवारांकीरता कमाल वयोमर्यादा पाच वर्षांनी शिथिलक्षम राहील.

३) **राष्ट्रीय आरोग्य अभियानात सद्यस्थितीत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना कमाल वयोमर्यादा लागू राहणार नाही. तथापि अर्जासोबत सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कार्यालयाच्या प्रमुखांचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.**

ग) अर्ज भरण्याबाबतच्या सुचना -

१) सर्व प्रथम ज्या पदाकरीता अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नाव ड्रॉप बॉक्स (DROP BOX) मधून निवडावे.

२) उमेदवाराने स्वतःचे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्रा प्रमाणेच अचूक पणे नोंदवावे. अर्जा सोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

३) माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्रा मध्ये नमूद केलेली जन्म तारीखच अर्जात नमूद करावी.

४) जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांका पर्यत असणारे उमेदवाराचे वय (वर्ष, महिने व दिवस) अर्जात अचूक नमुद करावे.

५) अर्जात उमेदवाराचे लिंग या बाबतची माहिती नमूद करावी.

६) अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) अर्जा सोबत सादर करणे आवश्यक आहे.

७) अर्जा मध्ये उमेदवाराने स्वतःचा वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे. मुलाखती साठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखती संदर्भात देण्यात येणा-या सुचना ई-मेल व्दारे देण्यात येतील. पात्र उमेदवारांची यादी विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर ई-मेल आयडी पद भरती प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत चालू राहील व ई-मेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

**पद भरती बाबत पात्र/अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी आणि पदभरती बाबतच्या आवश्यक सुचना व सुधारणा वेळोवेळी या कार्यालयाच्या** (www.arogya.maharashtra.gov.in) **संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतील याकरिता वेळोवेळी संकेतस्थळावर भेट देणे देखील बंधनकारक आहे.**

८) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवास आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे, असल्यास त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

९) उमेदवाराने आपला जातीचा तपशील अचूकपणे नमूद करावा.

१०) इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गात मोडणा-या उमेदवारांनी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अशा उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात येतील.

११) अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायमस्वरूपी पत्ता गुगल फॉर्ममध्ये अचूक नमूद करावा.

६/७/२२

घ) शैक्षणिक अर्हता/पात्रता -

१) शैक्षणिक अर्हते बाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.

२) गुगल अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिरातीमध्ये नमुद शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

३) शैक्षणिक अर्हता ज्या तारखेस प्राप्त केली आहे ती तारीख अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. (निकाल घोषीत झालेली तारीख)

४) **अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेल्या गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुणांची टक्केवारी व अर्जात नमुद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.**

५) **अंतिम प्रमाणपत्रा मध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये रूपांतर करून ते संबंधित संस्थेकडून प्रमाणित करून घ्यावे. मुलाखतीच्या वेळी ती सादर करावी.**

६) उमेदवारांची गुगल फॉर्ममध्ये नमुद माहिती नुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.पात्र उमेदवारांनी अर्जात नमूद केलेल्या सर्व शैक्षणिक अर्हते बाबतची सर्व प्रमाणपत्र/कागदपत्र मुलाखतीच्या वेळी एक प्रत या कार्यालयास सादर करणे अनिवार्य राहील.

७) पात्र उमेदवारांनी मुलाखतीच्या दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिका न जोडल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल.

८) पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यताप्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

ड.) अनुभव -

१) शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.

२) अनुभवाचा तपशील नमूद करताना पहिली नियुक्तीचा कालावधी ते सध्याचा नियुक्ती कालावधी या क्रमानेच द्यावा.

३) अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना ज्या कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे अशाच कार्यालयाचा तपशील फॉर्म मध्ये नमूद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.

४) अनुभवाचा तपशील नमूद करताना रूजू दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर तारखा अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.

५) ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

च) संगणक अर्हता व इतर -

१) MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा.

छ) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र -

१) शासनाच्या धोरणानुसार उमेदवारास लहान कुटुंब धोरणाचे पालन करणे आवश्यक राहील.

5/7/22

२) विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र मुलाखतीस पात्र उमेदवाराने मुलाखती दरम्यान सादर करणे अनिवार्य आहे .

ज) अर्ज शुल्क -

१) उमेदवारास अर्जासोबत अर्ज शुल्काचा धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.२००/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१००/- रकमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) अर्ज शुल्क असेल. धनाकर्ष पुढील नावे काढावा.

**"STATE HEALTH SOCIETY MAHARASHTRA - OTHER "**

२) योग्य धनाकर्षा शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

३) एका पेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करीत असल्यास प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र धनाकर्ष जोडावा.

झ) उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी-

१) उमेदवाराने गुगल फॉर्मची प्रिंट काढल्यावर फोटो करीता राखीव जागेवर त्याचे अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये.

२) स्वाक्षरी करीता राखीव जागेत स्वाक्षरी करावी.

त्र) निवड प्रक्रिया -

१) सदर पदभरतीच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या अर्जाच्या संख्येनुसार निवड प्रक्रिया केवळ मुलाखतीद्वारे किंवा लेखी व मुलाखतीव्दारे ठरविण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई यांच्याकडे राखुन ठेवले आहेत.

२) अर्जाच्या संख्येनुसार उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

३) लेखी परीक्षा घ्यावयाची झाल्यास त्याबाबत संबंधित सुचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

४) मुलाखतीव्दारे निवड करावयाची असल्यास मा. आयुक्त यांच्या मान्यतेने निकष लावून १:३ ते १:५ उमेदवारांची निवड मुलाखतीसाठी करण्यात येईल. मुलाखतीने उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन पदवी परीक्षेतील अंतिम वर्षाचे गुण, अतिरिक्त अर्हता , अनुभव आणि मुलाखतीचे गुण विचारात घेऊन खालील तक्त्यानुसार करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ | पदाकरीता आवश्यक किमान अर्हता | अंतिम वर्षातील एकूण प्राप्त गुणांच्या (टक्केवारीच्या) प्रमाणात ५० गुण |
| आ | पदाकरीता आवश्यक अतिरिक्त अर्हता /पदव्युत्तर अर्हता | अंतिम वर्षातील एकूण प्राप्त गुणांच्या (टक्केवारीच्या) प्रमाणात १० गुण |
| इ | पदाकरीता आवश्यक अनुभव | प्रत्येक वर्षाकरीता ५ गुण (कमाल २० गुण) |
| ई | आवश्यकतेनुसार मुलाखत | २० गुण |

५) कोविड-१९ साथीच्या परिस्थितीमुळे मुलाखती/लेखी परिक्षा घेणे शक्य नसल्यास शैक्षणिक अर्हता व अनुभव विचारात घेऊन निवड प्रक्रिया राबविण्यात येईल.

६) उपरोक्त निवड प्रक्रिये संदर्भात आवश्यकते नुसार बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडे राहतील, त्यामुळे उपरोक्त नमूद निवड प्रक्रियेत परिस्थिती अनुरूप बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ट) सर्वसाधारण सुचना-

१. गुगल लिंकमार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेला अर्ज उमेदवारांनी भरणे आवश्यक आहे.

5/7/22

२. सदर पदभरती प्रक्रियेबाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती आरोग्य विभागाच्या अधिकृत संकेतस्थळा वरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी www.arogya.maharashtra.gov.in या संकेस्थळास भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

३. जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत बदल होण्याचा संभव आहे.

४. राज्य शासनाने एसईबीसी आरक्षण रद्द झाल्याच्या अनुषंगाने अद्याप छोटया गटांच्या पदांकरीता आरक्षण जाहीर केलेले नसल्याने सदर पदांकरीता दर्शविण्यात आलेले आरक्षण हे तात्पुरते आहे. आरक्षण धोरण जाहीर होताच त्यानुसार नियुक्ती करण्यात येणा-या कंत्राटी कर्मचा-यांचा समावेश त्यांच्या प्रवर्गानुसार त्या-त्या बिंदूवर केला जाईल व अतिरिक्त ठरणा-या कंत्राटी कर्मचा-यांच्याबाबतीत योग्य निर्णय त्या-त्या वेळी घेण्यात येईल.

५. जाहीरातीत नमूद केलेली पदे ही पुर्णतः कंत्राटी स्वरुपाची असून ती राज्य शासनाची नियमित पदे नाहीत या पदांचा राज्य शासनाच्या पदांशी काहीही संबंध नसून उमेदवार राज्य शासनांच्या नियमित पदावर समायोजन करण्यांची मागणी करु शकणार नाही.

६. जाहीरातीत नमूद केलेले पदाचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

७. महानगरपालिका/नगरपालिका स्तरावरील पदांकरीता अर्ज केलेल्या व नियुक्तीस पात्र ठरलेल्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार राज्यातील कोणत्याही महानगरपालिका/ नगरपालिकेतील पदस्थापनेच्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल .

८. राज्यस्तरावरील Public Health Manager या पदावर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना आयुक्तालय, आरोग्य सेवा, मुंबई येथे पदस्थापना देण्यात येईल.

९. गुगल फॉर्म भरण्यांची अंतिम तारीख दि.२५/०७/२०२२ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत असेल.

१०.गुगल फॉर्म पुर्ण भरल्यावर त्यांची प्रिंट काढावी. सदर प्रिंटची स्वसाक्षांकित प्रत व आवश्यक रक्कमेचा धनाकर्ष जोडून अर्ज खालील पत्त्यावर दि.०५/०८/२०२२ पुर्वी पोहोचेल अशा रीतीने हस्तदेय सादर करावा किंवा टपालाने/कुरीयरने मिळेल अशा रीतीने पाठवावा.

**मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, ३ रा मजला,**
**सेंट जॉर्जेस रुग्णालय परिसर, पी. डिमेलो मार्ग,**
**सी. एस. एम. टी. जवळ, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.**

११) गुगल फॉर्मचा अर्ज व धनाकर्ष लिफाफ्यातच सादर करावा. सदर लिफाफ्यावर अर्ज केलेल्या अर्जदाराचे नाव व पदाचे नाव नमूद करावे.

१२) हस्तदेय अर्ज वरील नमुद पत्त्यावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी ( शनिवार, रविवार व सावर्जनिक सट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत स्वीकारले जातील.

१३) सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे वा सदर पदभरती अंशतः किंवा पुर्ण रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई राखून ठेवले आहेत.

१४) सदर जाहीरातीच्या अनुषंगाने काही शंका असल्यास ०२२ २२७१७५००/५८१/५३३ या क्रंमाकावर संपर्क करावा.

5/7/22

टिप :-

१) गुगल फॉर्ममध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार मुलाखतीस पात्र/अपात्र उमेदवारांची यादी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

२) जे उमेदवार मुलाखतीच्या वेळी मुळ कागद पत्रे व स्वसाक्षांकीत कागदपत्राची प्रत या कार्यालयास सादर करणार नाहीत ते उमेदवार मुलाखतीस पात्र राहणार नाहीत याची कृपया नोंद घेण्यात यावी

5/7/22